# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २८/२/२००८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१६) इतिवृत्त

गुरूवार दिनांक **२८ फेब्रुवारी २००८** रोजी मा.सभापती **श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा, महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ३.५५ वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. मधुकर दामोधर सावंत
2. श्री. संजय पांडूरंग शिरसाट
3. श्रीमती जयश्री किवळेकर
4. श्री. पुरूषोत्तम ठाकुर
5. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
6. श्री. अ. रशीद खान (मामु)
7. श्री. संजय जोशी
8. श्री. वसंत नरवडे पाटील
9. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
10. श्री. मो. जावेद मो. इसाक
11. हाजी शेरखान अ. रहेमान
12. श्री. अ. साजेद अ. सत्तार

**विषय क्र. 369 :**

दिनांक **17/1/2008**(का.प.क्र.14) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मुख्य पशुसंवर्धन अधि. : दिनांक 17/1/2008 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील प्रस्ताव क्र.317 अन्वये श्वान निर्बिजीकरणाचे दर मंजूर झालेले आहेत. सदर दरात 12.5% सेवाकर वेगळे राहील व मान्य दर हे एक वर्षासाठी लागू राहतील. अशी दुरूस्ती व्हावी, ही विनंती.

मा.सभापती : दिनांक 17/1/2008 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील प्रस्ताव क्र.317 अन्वये श्वान निर्बिजीकरणाचे मंजूर झालेल्या दरात 12.5% सेवाकर वेगळे राहील व मान्य दर हे एक वर्षासाठी लागू राहतील. अशी दुरूस्ती करण्यात येते.

**ठराव :**

“दिनांक 17/1/2008 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील प्रस्ताव क्र.317 अन्वये श्वान निर्बिजीकरणाचे मंजूर झालेल्या दरात 12.5% सेवाकर वेगळे राहील व मान्य दर हे एक वर्षासाठी लागू राहतील” या दुरूस्तीसह दिनांक **17/1/2008** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 370 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड-क कार्यालय, मोंढा या इमारतीमधील आरोग्य केंद्राचे नुतनीकरण करणेकरीता सा.बां.विभागचे सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.14,35,900/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करणेबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 अंतर्गत विशेष शासकीय अनुदानाच्या तरतुदीतून करण्यात येणार आहे. त्यानुसार उपरोक्त कामाचे र.रू.14,35,900/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड-क कार्यालय, मोंढा या इमारतीमधील आरोग्य केंद्राचे नुतनीकरण करणेकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,35,900/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 371 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) प्रस्ताव सादर करीत आहेत की, मल्हार चौक, विजयनगर चौक पासून ते तिरूपती विहार पर्यंत आरसीसी गटार बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-2007 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.19,99,900/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च शहरी भागात खुल्या गटारी बांधणे या लेखाशिर्षाखाली पृष्ठ क्र.167 अ.क्र.04 वर रू.20.00 लक्ष उपलब्ध तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

करीता अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मल्हार चौक, विजयनगर चौक पासून ते तिरूपती विहार पर्यंत आरसीसी गटार बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,99,900/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 372 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.29 अंतर्गत एस.टी. कॉलनी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.10,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात शहरी भागातनवीन डांबरी रस्ते तयार करणे या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समितीची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केलेले आहे.

तरी रक्कम रू.10,00,000/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.29 अंतर्गत एस.टी. कॉलनी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.10,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 373 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत असलेल्या फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या (56 द.ल.लि. व 100 द.ल.लि.) संरक्षित भिंतीची उंची वाढवणे व संलग्नीत कामे करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन 2006-07 च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.12,96,800/- इतकी आहे. आर्थिक वर्ष 2007-08 च्या अर्थसंकल्पात जायकवाडी पाणी पुरवठा जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षका अंतर्गत एकत्रित तरतुद करण्यात आली आहे. मा.आयुक्तांनी अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली असून अंदाजपत्रक स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याबाबत आदेशीत केलेले आहे.

करीता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राच्या संरक्षित भिंतीची उंची वाढवणे व संलग्नीत कामे करणे या कामाचे र.रू.12,96,800/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत असलेल्या फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या (56 द.ल.लि. व 100 द.ल.लि.) संरक्षित भिंतीची उंची वाढवणे व संलग्नीत कामे करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. 12,96,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 374 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.26 मधील एन-8 भागातील ओंकार गॅस ते वेणुताई चव्हाण शाळेजवळ नाल्याचे पुन:र्बांधकाम करण्याच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या व सा.बां. विभागाच्या सन 2006-07 च्या दरसुची नुसार रक्कम रू.11,04,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांची मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च अर्थसंकल्प सन 2007-08 मधील नाला ट्रेनींग या लेखाशिर्षकातील पा.क्र.W212 वरील अ.क्र.10 तसेच पान क्र.W174 अ.क्र.12 मधील विविध उद्यान विकसीत करणे व संरक्षित भिंत बांधणे यासाठीच्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

करीता कामाचे अंदाजपत्रक रू.11,04,000/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.26 मधील एन-8 भागातील ओंकार गॅस ते वेणुताई चव्हाण शाळेजवळ नाल्याचे पुन:र्बांधकाम करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,04,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 375 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, ऐतिहासिक कटकट दरवाज्याची दुरूस्ती व जपवणूक करणे या कामाचे अंदाजपत्रक या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.11,11,000/- चे सन 2006-07 च्या सा.बां.विभागाच्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प सन 2007-08 मधील ऐतिहासिक वास्तु दुरूस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येणार आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणे बाबत आदेशीत केलेले आहे.

तरी ऐतिहासिक कटकट दरवाजाची दुरूस्ती व जपवणूक करणेच्या कामाचे रक्कम रू.11,11,000/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऐतिहासिक कटकट दरवाज्याची दुरूस्ती व जपवणूक करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,11,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 376 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, ऐतिहासिक रोशन दरवाजाची दुरूस्ती व जपवणूक करण्याचे काम पूर्ण करण्यात आलेले असून सदर रोशन दरवाजाच्या समोर सन 1991-92 या आर्थिक वर्षात मिनार बांधण्यात आलेले आहे. सदर मिनार हा रोशन दरवाजाच्या सौंदर्यीकरणात बाधीत ठरत असल्याने मिनार हटविणे बाबत स.नगरसेवकांनी सुचविलेले आहे. त्यानुसार विभागाने इनटॅक या ऐतिहासिक वास्तुंशी संबंधीत संस्थेच्या वास्तुतज्ज्ञाकडून अभिप्राय मागविले असता त्यांनी सदर मिनार ऐतिहासिक रोशन दरवाजाच्या सौंदर्यात बाधीत होत असल्याने हटविणे बाबत अभिप्राय कळविलेले आहे. सदर मिनार हटविणे बाबतचा धोरणात्मक निर्णय घेणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेबाबत आदेशीत केलेले आहे.

तरी ऐतिहासिक रोशन दरवाजा समोरील मिनार हटविणे बाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : रोषण गेट ही ऐतिहासिक वास्तू आहे की नाही प्रशासनाने खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : शहरात जे 52 दरवाजे होते त्यापैकी हा एक ऐतिहासिक दरवाजा आहे. पुरातत्व खात्याकडे सद्यस्थितीत असलेल्या दरवाजा पैकी 13 दरवाजे देखभाल व दुरूस्तीसाठी महापालिकेकडे दिले आहे. तीन दरावाजे पुरातत्व खात्याकडे ठेवले आहे. रोषण गेट महापालिकेकडे आलेला आहे.

श्री.संजय जोशी : बेगमपूरा भागात बेबीका मकब-याच्या बाजूला झालेली घरे पाडण्यासाठी पुरात्तत्व विभागाने महापालिकेच्या कर्मचा-यांना सोबत घेवून गेले होते.त्या विभागाच्या कर्मचा-यासोबत महापालिकेचे कर्मचारी पाठविण्याचा अधिकार महापालिकेला आहे का? एकीकडे असे होते तर रोषण गेटच्या समोर मिनारमुळे अडथळा निर्माण होत असेल तर महानगरपालिकेने का बांधले होते. पाडू यात दुमत नाही. महानगरपालिकेने 1991-92 साली बाधले आपणच नियम मोडले का, त्यावेळी बॉडी नव्हती का? प्रशासनाने नियम मोडीत काढले काय?

मा.सभापती : मिनारच्या बांधकामासाठी किती खर्च आलेला होता.

अति.शहर अभियंता : जवळपास 1 लक्ष खर्च झालेला असेल. स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून बांधण्यात आलेले होते.

श्री.अ.रशिद खान : पूर्वीपासून दरवाजे नगरपालिकेकडे होते चार दरवाजांना रंगरगोटी करण्यात आली त्यावेळी मुख्याधिकारी होते. विना परवानगी दरवाजाची रंगरंगोटी का केली म्हणून मुख्याधिकारी यांचेवर पोलीस केस झालेली होती. तेंव्हा पासून दरवाजाची देखभाल करणे बंद केले. दरवाजे मोडकळीस येवून पडण्याच्या स्थितीत होता. काम करूशकत नव्हतो नगरसेवकाच्या स्वेच्छानिधीतून हे काम केले. ऐतिहासिंक वास्तु

पासून 100 मीटरपर्यंत जे असेल ते तोंडण्यात यावे असे मा. उच्च न्यायालयाचे आदेश दिलेले आहे.स.सदस्य जे बोलत आहे ते बरोबर आहे.

श्री.संजय जोशी : गेटच्या समोर बांधले ही प्रशासनाने चूक केलेली आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : नगरसेवकाच्या स्वेच्छानिधीतून बांधले असले तरी महापालिकेचा निधी गेलेला आहे. बांधणार पुन्हा पाडणार कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर कोण जबाबदार असणार आहे.

मा.सभापती : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऐतिहासिक रोशन दरवाजाची दुरूस्ती व जपवणूक करण्याचे काम पूर्ण झ ााले असल्याने सदर रोशन दरवाजाच्या समोर सन 1991-92 साली बांधण्यात आलेला मिनार हा रोशन दरवाजाच्या सौंदर्यीकरणात बाधीत ठरत असल्याने सदरील मिनार हटविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 377 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि. व विद्युत) मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बीबीका मकबरा पाठीमागे मो.पहाडसिंगपुरा भागातील कला हौ.सोसा., विद्याविहार, संभाजी कॉलनी, थत्ते ले-आऊट कॉलनी, ग्रंथालय कॉलनी, निपटनिरंजन कॉलनी, नर्सेस हौ.सोसा. ह्या वसाहती मंजूर रेखांकनातील असून 100% विकास खर्च भरलेला आहे. या वसाहतींना जलनिःसारण वाहिनीची व्यवस्था नाही. तसेच सदर वसाहतीतील ड्रेनेज डिस्पोजल करीता नाल्यात मुख्य सिव्हर लाईन नसल्यामुळे नाल्यात मुख्य सिव्हर लाईन टाकणेचा प्रस्ताव आहे. मोहल्ला बेगमपुरा, विद्युत कॉलनी ते कला हौ. सोसा. पर्यंत नाल्यात 500 मी.मी. व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकोच्या कामासाठी सन 2000-01 च्या म.जी.प्रा. व सा.बां.विभागाच्या दरसुचीनुसार रक्कम रू.21,67,910/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची दि.8/4/2003 रोजी मंजुरी प्राप्त झालेली होती. त्यास दि.27/5/2003 रोजी मा.स्थायी समितीने ठराव क्र.75 नुसार मान्यता दिली होती. त्यानंतर निविदा कार्यवाही होऊन उपरोक्त कामाच्या एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. पैकी सर्वात कमी मे.हुमा कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 7.77% जास्त दराची निविदेस मंजुरी मिळाली.

कार्यादेश जा.क्र.मनपा/जलनिःसारण/918/2003 दि.11.12.2003 अन्वये ठेकेदार मे.हुमा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून काम हाती घेतले. कामाची मुळ मुदत 12 महिने दि.10/12/2004 पर्यंत होती. त्यानंतर दि.31/5/2005 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असता काम पूर्ण होऊ शकले नाही. विहित कालावधी मध्ये झालेल्या कामाचे दोन दरम्यानचे देयक प्रथम र.रू.2,05,828/- दि.23/9/2004 व द्वितीय र.रू.2,73,240/- दि.31/3/2005 असे एकूण र.रू.4,79,068/- मे. हुमा कन्स्ट्रक्शन यांना अदा करण्यात आले. निविदा रक्कमेच्या सुमारे 25% काम पूर्ण झाले. परंतु 75% काम पूर्ण करण्यास संबंधीत ठेकेदारास कार्यालयाकडून वारंवार कळविण्यात आले असता त्यांनी पत्रांना प्रतिसाद दिला नाही. तसेच त्यांचे घरच्या पत्त्यावर प्रतिनिधीस पाठविण्यात आले असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. निविदा स्पर्धेतील द्वितीय व तृतीय क्रमांकाचे कंत्राटदार यांना उर्वरीत काम मंजूर निविदा दराप्रमाणे करण्याबाबत विचारणा केली परंतु त्यांनी देखील प्रतिसाद न दिल्याने शिल्लक काम पूर्ण करणेसाठी उव्ररीत र.रू.13,64,068/- ची फेरनिविदा तीन वेळा प्रसिध्द करण्यात आली. एकही निविदा दर भरून प्राप्त झाली नाही.

उर्वरीत कामाचे म.जी.प्रा. दरसुची सन 2006-07 नुसार रक्कम रू.17,83,866/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास दि.5/1/2008 रोजी मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे. मे. ुमा कन्स्ट्रक्शन यांनी पूर्ण न केलेल्या कामापैकी उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी सन 2006-07 च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रू.17,83,866/- मान्यतेस्तव आणि अल्पमुदतीच्या निविदा बोलावून येणाऱ्या नवीन एजन्सी मार्फत उर्वरीत काम पूर्ण करणेच्या मंजुरीस्तव निविदा स्पर्धेतून विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीबीका मकबरा पाठीमागे मो.पहाडसिंगपुरा भागातील कला हौ.सोसा., विद्याविहार, संभाजी कॉलनी, थत्ते ले-आऊट कॉलनी, ग्रंथालय कॉलनी, निपटनिरंजन कॉलनी, नर्सेस हौ.सोसा. ह्या वसाहती मंजूर रेखांकनातील वसाहतीतील ड्रेनेज डिस्पोजल करीता नाल्यात मुख्य सिव्हर लाईन टाकणे, मोहल्ला बेगमपुरा, विद्युत कॉलनी ते कला हौ. सोसा. पर्यंत नाल्यात 500 मी.मी. व्यासाची जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामातील, कामाचे गुत्तेदार मे. हुमा कन्स्ट्रक्शन यांनी पूर्ण न केलेल्या कामापैकी उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.17,83,866/- च्या अंदाजपत्रकास आणि अल्पमुदतीच्या निविदा बोलावून येणाऱ्या नवीन एजन्सी मार्फत उर्वरीत काम पूर्ण करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 378 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.07, भिमनगर भावसिंगपुरा येथे विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविण्याच्या कामाचे सा.बां. विभाग सन 2006-2007 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.15,14,830/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी दि.21.1.2008 अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्प सन 2007-08 मध्ये नविन कॉंक्रीट रस्ते (स्लम भाग) या शिर्षकातुन पृष्ठ क्र.W-63 अ.क्र.5 व पृष्ठ क्र.W-182 अ.क्र.1, 2, 3 नुसार रक्कम रू.15.15 लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.15,14,830/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.07, भिमनगर भावसिंगपुरा येथे विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.15,14,830/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 379 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.89 दशमेशनगर मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.19,47,295/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-2008 या आर्थिक वर्षात नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रू.19,47,295/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.89 दशमेशनगर मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,47,295/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 380 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.89 शंभुमहादेवनगर मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता सा.बां. खात्याच्या सन 2006-2007 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.17,67,600/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रू.17,67,600/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.89 शंभुमहादेवनगर मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,67,600/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 381 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.89 प्रशांतनगर, म्हाडा कॉलनी व ज्योतीनगर अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाकरीता सा.बां. खात्याच्या सन 2006-2007 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.13,94,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-2008 या आर्थिक वर्षात पुनःर्डांबरीकरण या लेखा शिर्षाखाली करण्यात येणार आहे.

तरी रक्कम रू.13,94,000/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.89 प्रशांतनगर, म्हाडा कॉलनी व ज्योतीनगर अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,94,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 382 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगरच्या उत्तरेकडील रहिवाश्यांच्या घरांना जाण्या-येण्याकरीता रस्ता नाही. या घरांच्या पश्चिमेकडील न.भु.क्र.12162/पैकी मधील खुल्या जागेतून सध्या वरील रहिवाशांचा वापर आहे. तेथील रहिवाशांनी जाण्यायेण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याची महानगरपालिकेकडे विनंती केली असून, पाठपुरावा केला आहे. न.भु.क्र.12162/पैकी या मिळकतीच्या जमीन मालकाने 4.50 मीटर रूंद Non-DP रस्त्यासाठी जागा देण्यास संमती दिली आहे. उक्त Non-DP रस्त्याचे सार्वजनिक उपयोगासाठी भूसंपादन करण्यास सर्वसाधारण सभा दि.18/8/2005 मधील ठराव क्र.48/5 नुसार मान्यता दिली असून भूसंपादन करणेस येणाऱ्या अंदाजे रक्कम रू.12.00 लाख अपेक्षीत खर्चास मंजुरी मिळालेली आहे.

नगर भुमापन कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून प्रस्तावित 4.5 मीटर Non-DP रस्त्याची मोजणी करण्यात आली असून मोजणीनुसार रस्त्याचे भूसंपादन करावयाचे क्षेत्र 278.80 चौ.मी. आहे. Non-DP रस्त्याच्या 278.80 चौ.मी. क्षेत्राचा देय मोबदला रितसर सर्व वजावटी करून रक्कम रू.9,30,272/- एवढा होतआहे. वरील मुल्यांकनास मान्यता झाल्यास Non-DP रस्त्याच्या क्षेत्राचे रितसर खरेदीखत करून घेण्यात येईल. खरेदीखताचा एकुण अपेक्षीत खर्च रूपयचे 28,800/- येईल. खरेदीखताचा खर्च 50:50% महानगरपालिका व मिळकतधारकांना करावयाचा आहे. मिळकत धारकाच्या मोबदला रक्कमेतून 50% खरेदीखताचा खर्च वजा करण्यात आलेला आहे. खरेदीखत पंजीकृत करतांना देय मोबदला रक्कम रूपये 9,30,272/- च्या 10% रक्कम रूपये 93,027/- संबंधीत मिळकत धारकास देण्यात येईल आणि उर्वरीत 90% रक्कम रूपये 8,37,245/- उक्त रस्त्याचे 278.80 चौ.मी. क्षेत्राची पी आर कार्डवर महानगरपालिकेच्या नांवाची नोंद झाल्यानंतर देण्यात येईल.

न.भु.क्र.12162/पैकी मधील Non-DP रस्त्यातील जमीनीच्या भूसंपादनाच्या मुल्यांकनास व खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.मंधुकर सावंत : महापालिकेने कोणती जागा जिल्हाधिकारी कार्यालय यांचे मार्फत घेण्याचे ठरले होते महापालिका परस्पर का जागा घेत आहे.

उपअभियंता(न.र.) : रस्त्यासाठी जी जागा घेत आहे मालकी बघुनच जागेचा मोबदला दिला जाईल.

श्री.मधुकर सावंत : गारखेडा येथील जागेचो प्रकरण घडले होते त्यानंतर असे ठरले की वाटाघाटीने कोणतीही जागा महापालिकेने घ्यायची नाही. महापालिकेसाठी भूसंपादन अधिकारी आहे, अस्थापनेवर वर्षाला 24-25 लक्ष खर्च येतो. त्याचें माध्यमातून का घेत नाही वाटाघाटीने का घेत आहोत. रेल्वेस्टेशनला महापालिकेच्या इमारतीमध्ये भुसंपादन अधिकारी यांचे कार्यालय आहे. त्यांचे माध्यमातून ही कार्यवाही व्हावी असे माझे मत आहे.

मा.सभापती : पुढचा विषय ही अशाच प्रकारचा आहे.

श्री.मधुकर सावंत : एकदा निर्णय झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी नसता स्थगित करावे.प्रत्येक वेळी वेगवेगळे निर्णय घेवू नये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : जागा भुसंपादनाचे एकूण किती प्रकरणे आहेत याची माहिती कोण देणार आहे. जागा संपादनापोटी महापालिकेने 8.80 कोटी दिले. रोषण गेट ते किराडपूरा रस्त्याचे चार वर्षापूर्वी 1.50 कोटी जमा झालेले आहे याबद्दल सभागृहात माहिती द्यावी.

श्री.मधुकर सावंत : यापूर्वी खाजगी वाटाघाटीचे दोन जागेच्या प्रकरणात महापालिकेची फसवणूक झ ालेली होती. काही अधिका-यांवर प्रकरण आले होते. तसे पुन्हा होवू नये त्यासाठी या कामासाठी जो विभाग आहे त्या विभागाच्या मार्फत ही कार्यवाही करावी. असे माझे मत आहे.विषय क्र.383 या प्रमाणेच आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : चेलीपूरा रस्त्यावर तीन मालमत्ता धारकांना मा. उच्च न्यायालयाचे स्थगिती असतांना 56 लक्ष जागेचा मोबदला दिला तसेच वार्ड 97 मध्ये एका जागेपोटी 54.80लक्ष रूपये तीन वर्षापूर्वी दिले. जागेवर मेहनत करणारा एक, 7/12 वर दुस-या तर पजेशन तिस-याच व्यक्तीच्या नावाचे असून अदयाप जागेचा ताबा घेतलेला नाही.

श्री.वसंत नरवडे : यात मिळकत धारकांचे नाव दिले नाही.

श्री.संजय जोशी : सभागृहाची भावना लक्षात घेता यास स्थगिती देवून पुढील बैठकीत नावासह सादर करावे.

मा.सभापती : विषय क्र. 382, 383 स्थगिती देण्यात येते.

श्री.अ.रशीद खान : कारगील वन विषय त्याच विभागाकडे पाठवित आहोत यासही स्थगिती दयावी नसता दोन्ही विषय त्या विभागाकडे पाठविण्यात यावे.नावासहीत आले तर वाटाघाटीच करणार आहे.सर्वसाधारण सभेत ठेवलेला होता.

श्री.मंधुकर सांवत : सदर विभागावर किती खर्च केला जातो लेखा विभागाकडून माहिती घ्यावी.

श्री.अ.रशिद खान : दोन्ही प्रस्ताव पाठवावे नसता दोन्हीही स्थगित ठेवावे.

श्री.वसंत नरवडे : जागा मालकाचे नाव दिले नाही मोबदला कुणाला देणार आहे.दुस-यांचे नावावर महापालिकेकडून पैसे काढायचा प्रयत्न असू शकतो.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : चेलीपूरा व सादातनगर जागेच्या संदर्भात खुलासा केला नाही.

उपअभियंता(ने.र.) : पुढील बेठकीत माहिती दिली जाईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : प्रशासनाकडे कोणतीही माहिती नसते प्रत्येक वेळी पुढील बैठकीत खुलासा दिला जाईल असे म्हटले जाते.हे बरोबर नाही.

श्री.मो.जावेद मो.इसाक: चेलीपूरा जागा भुसंपदना पोटी अनेकांना मोबदला दिला जागा महापालिकेच्या ताब्यात घेतली की नाही या संदर्भात सहा महिण्यापासून माहिती विचारत आहे योग्य खूलासा मिळत नाही.

मा.सभापती : हा विषय चर्चेमध्ये घेता येईल.

**ठराव :**

सदरील विषय तुर्त स्थगित ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 383 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मौजे गारखेडा सर्व्हे नं.51/1, आरक्षण क्रमांक 160 खुली जागा साठी आरक्षीत असून सध्या या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे कारगील वन विकसीत करण्यात येत आहे.

उक्त आरक्षणातील बाधीत मिळकतीचे सन 2007 चे शिघ्र सिध्द गणकानुसार मुल्यांकन करून खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यासाठी जे कार्यालयीन परिपत्रक आहे त्यानुसार विकास खर्च व जमीन विकास शुल्क आणि विकासकाचा फायदा 20% आणि खरेदीखताचा 50% खर्च याची वजावट करून देय मोबदला रक्कम काढण्यात आलेली होती. त्यास बाधीत मिळकतधारक (1)श्रीमती जयतुनबी भ्र.शेख मुसा पटेल, (2)शेख श्फीक शेख मुसा, (3)नजीर खाँ बाबा खाँ यांनी आक्षेप ोतला असून विनंती केली की, त्यांची जागा विकसीत असल्यामुळे कोणतीही वजावट करण्यात येवू नये आणि 30% दिलासा रक्कम देण्यात यावी.

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी असे मान्य केले की, (अ) 30% दिलासा रक्कम दिली जाणार नाही, (ब) विकासकाचा फायदा 20% ची वजावट करण्यात येवू नये, (क) चालु वर्ष 2008 चे शिघ्र सिध्द गणक दर रू.3400/- नुसार मुल्यांकन करण्यात यावे, (ड) फक्त जमीन विकास शुल्क रूपये 20/- प्रती चौ.मी. ची वजावट करण्यात यावे, (इ) खरेदीखताचा खर्च महानगरपालिकेतर्फे व मिळकत धारकातर्फे 50-50 टक्के करण्यात यावा.

करीता वरील प्रमाणे मान्यता मिळाल्यास खालील प्रमाणे देय मोबदला रक्कम होईल.

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | बाधीत क्षेत्र चौ.मी. | मा.स्थायी समितची मान्यता मिळालेला मोबदला रक्कम रू. | जमीन विकास शुल्क, विकासकाचा नफा ची वजावट न करता येणारा देय मोबदला | फरकाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 51/1 | 167 | 3,75,837/- | 5,47,400/- | 1,71,563/- |
| 2 | 51/1 | 112 | 2,52,045/- | 3,67,000/- | 1,14,955/- |
| 3 | 51/1 | 56 | 1,27,022/- | 1,83,400/- | 56,378/- |
| | **एकुण** | **335** | **7,54,904/-** | **10,97,800/-** | **3,42,896/-** |

करीता प्रकरणात मोबदला रक्कम संबंधीतांना अदा करण्यासाठी व खरेदी खताचा 50% खर्च रक्कम रू.33,000/- बाबत प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : हा विषय स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

सदरील विषय तुर्त स्थगित ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 384 :**

कार्यकारी अभियंता (वि/ड्रे/इ/उ) महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.69 मधील जवाहरकॉलनी महानगरपालिका शाळेच्या पहिल्या मजल्यावरील स्लॅबचे प्लास्टर बऱ्याच ठिकाणी पूर्णपणे पडले होते व स्लॅब मधील स्टील गंजलेले होते. तसेच शाळेच्या स्लॅबचा इतर ठिकाणी सुध्दा बराच भाग फुगलेला होता, त्यामुळे तेथे शालेय वर्ग बंद करण्यात आले होते. तथापी सदरील ठिकाणी विद्यार्थ्यांची वर्दळ असल्याने कोणताही अपघात होऊ नये यासाठी सदरील शाळेची वास्तुविशारद तथा इंजिनियर श्री.एन.आर.वर्मा यांचेकडून पाहणी करण्यात आली. त्यानुसार वरच्या मजल्यावरील स्लॅब काढून पुन्हा नव्याने टाकणे आवश्यक असल्याने सदरील काम उपलब्ध गुत्तेदार श्री.महेश राजपूत यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने चालु करण्यात आले असून या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम 7,71,000/- रूपये आहे. करीता मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील अनुसूची ड प्रकरण 5 संविदाचे नियम 2(2) अन्वये सदरील काम वास्तुविशारद श्री.एन.आर.वर्मा यांचे देखरेखी खाली करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : हा प्रस्ताव प्रशासकीय असून आवश्यक असेल तर इतरही प्रस्ताव घेण्यात येतील. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.69 मधील जवाहरकॉलनी महानगरपालिका शाळेच्या पहिल्या मजल्यावरील स्लॅब काढून पुन्हा नव्याने टाकणे आवश्यक असल्याने सदरील काम (अ.प.रक्कम रू.7,71,000/-) उपलब्ध गुत्तेदार श्री.महेश राजपूत यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने, मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील अनुसूची ड प्रकरण 5 संविदाचे नियम 2(2) अन्वये वास्तुविशारद श्री.एन.आर.वर्मा यांचे देखरेखी खाली करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 385 :**

अतिरिक्त श्हर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.74 संघर्षनगर, सिडको येथील सी-सेक्टर व बेघर योजना येथील सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करण्यासाठी स्थायी समिती सभा दि.5/2/2008 ठराव क्र.362 अन्वये रक्कम रू.14,99,985/- चे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली असून ई-निविदाद्वारे बी-1 नमुन्यात निविदा माविल्या असता एकच निविदा प्राप्त झाली. सदरची निविदा मे. आर. के. कन्स्ट्रक्शन यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.99% जास्त दराची आहे. मा.आयुक्त यांनी त्यास मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी मे. आर.के. कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 5.99% जास्त दराची निविदा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.वसंत नरवडे पाटील: जे प्रस्ताव आलेले आहे, ही कामे याच वर्षी होणार की स्पील ओव्हरमध्ये जाणार आहे माहिती द्यावी. 150 कोटीची कामे स्पीलओव्हरमध्ये जात आहे आणखी 10 - 5 कोटीची कामे का वाढवून ठेवत आहे. बजेटची स्थिती काय आहे.

अति.शहर अभियंता : स्पील ओव्हरमध्ये ही कामे जाणार आहे.

मा.सभापती : ज्या कामासाठी बजेट ठेवले आहे ती कामे मंजूरीसाठी येणारच आहे. स्पील ओव्हरमध्ये गेली तरी पुढील वर्षी सुरूवातीलाच कामे होतील.

श्री.हिम्मतराव दाभाडे : मागिल वर्षीच्या बजेटमधील एक ही कामास माझ्या वार्डात सुरूवात झलेली नाही.

श्री.वसंत नरवडे : जेवढी कामे होणार असेल तेवढेच प्रस्ताव घेतले तर बजेट फुगवून येणार नाही. मंजूर केल्यानंतर काम होण्याची मागणी करतात.जे प्रस्ताव येतात बजेट प्रोव्हीजन सह येतात का याचा विचार करण्याची गरज आहे. 50 लक्ष पर्यंत वार्डात कामे होतील काही वार्डात कोटयावधी पर्यत कामे होते आहे. ठराविक वार्डात कामे होत नाही संचिका अधिकारी थांबवून ठेवतात वेळेवर भेटत नाही. स्थायी समितीचा अधिका-यावर अंकुश नाही.

मा.सभापती : ज्या वार्डात 50 लक्ष पर्यत कामे झालेली नाही त्याच वार्डातील हि कामे आहे.स्थायी समिती कडे अंदाजपत्रकाचे कोणतेही प्रस्ताव आल्यानंतर थंबविता येणार नाही.

श्री.वसंत नरवडे : प्रस्ताव थांबवून ठेवावे असे माझे मत नाही परंतू कामे होण्यासाठी बजेट प्रोव्हीजन आहे का ?

श्री.मधुकर सावंत : प्रत्येक वार्डात 50 लक्ष पर्यत कामे व्हायला पाहिजे होती परंतू काही वार्डात 50 लक्ष पेक्षा जास्त कामे झालेली आहे.

मा.सभापती : कमी जास्त रक्कमेची कामे झालेली आहे. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.74 संघर्षनगर, सिडको येथील सी-सेक्टर व बेघर योजना येथील सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार करण्यासाठी प्राप्त झालेली मे.आर.के. कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 5.99% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 386 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.17 श्रीकृष्णनगर फरशी मैदानात बॅडमींटन हॉल बांधणे करीता सा.बां.विभाग सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.13,95,072/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती ठराव क्र.257 दि.31.12.2007 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 1 निविदा विक्री झाली व 1 निविदा दर भरून प्राप्त झाली.

1. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन 5.00% कमी दराने

सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. त्यानुसार रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 5.00% कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.17 श्रीकृष्णनगर फरशी मैदानात बॅडमींटन हॉल बांधणे करीता प्राप्त झालेली रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 5.00% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 387 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र. 39 अंतर्गत राजाबाजार, कुंवारफल्ली, जाधवमंडी व खाराकुँआ येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.19,95,601/- असून निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 3 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 5.00% जास्त दराने |
| 2. | चंद्रम्मा आशन्ना | 15.00% जास्त दराने |
| 3. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 21.21% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 5.00% ने जास्त दर आहेत. सध्या बाजारात डांबराचे भाव वाढल्यामुळे उपरोक्त 5.00% जास्त दराने काम केल्यास या कामावर रक्कम रू.20,74,427/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 5.00% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. 39 अंतर्गत राजाबाजार, कुंवारफल्ली, जाधवमंडी व खाराकुँआ येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 5.00% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 388 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.59 खोकडपुरा व रोकडा हनुमान कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे करीता सन 2006-07 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.10.92 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.161 दि.23.10.2007 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 3 निविदा विक्री झाल्या व 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. ए. एस. क. कं. | 18.89% जास्त दराने |
| 2. | मे. आदीनाथ क.कं. | 21.21% जास्त दराने |
| 3. | मे. एम. ए. सिद्यीकी | 22.33% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अं.प.दरापेक्षा 18.89% जास्त दराची निविदा मे.ए.एस.क.कं. यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार मे. ए.एस.क.कं. यांची अं.प.दरापेक्षा 18.89% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.59 खोकडपुरा व रोकडा हनुमान कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्म्कदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 18.89% जास्त दराची मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 389 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.39 राजाबाजार अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे करीता सन 2006-07 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.18.00 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.253 दि.31.12.2007 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 3 निविदा विक्री झाल्या व 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 18.21% कमी दराने |
| 2. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | 18.00% कमी दराने |
| 3. | राणा कन्स्ट्र. कं. | 12.08% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अं.प.दरापेक्षा 18.21% कमी दराची निविदा आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 18.21% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.39 राजाबाजार अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 18.21% कमी दराची आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 390 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत मो.ब्रिजवाडी येथे विविध विकास कामे करणेच्या कामाचे सा.बां.विभागाच्या दरसूची सन 2005-06 नुसारचे अंदाजपत्रक रक्कम रू.3,48,48,006/- यास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदरील कामाचा खर्च एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत असलेल्या निधीमधुन प्रस्तावित आहे.

सदर कामासाठी तीन वेळेस जाहीर निविदा सूचना प्रसिध्दीस देण्यात आल्या असता, प्रतिसाद मिळाला नाही. नंतर चौथ्या वेळेस सदर कामासाठी वृत्तपत्रातून निविदा मागविल्या असता, निविदा विक्रीचे शेवटच्या तारखेपर्यंत विक्री झालेल्या एकूण 01 निविदा पैकी 01 निविदा प्राप्त झाली. सदर निविदा उपस्थित कंत्राटदारासमक्ष दि.1/2/2008 रोजी उघडण्यात आली असुन प्राप्त निविदा दर खालील प्रमाणे आहेत.

1. मे. एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. 44.44% जास्त दराने

प्राप्त दरांचा विचार करता सदरचे दर जास्त वाटत असल्याने दराबाबतच्या वाटाघाटीसाठी संबंधितास मा.आयुक्त यांचे दालनांत बोलाविण्यात आले असता, संबंधिताने 4.44% दर कमी करण्यास लेखी संमती दर्शविल्याने मे.एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांची दाखल निविदा दर 44.44% जास्त ऐवजी वाटाघाटी संमत 40.00% जास्त दराने मा.आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे.

सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 3,48,48,006/- पेक्षा 40.00% जास्त दराने म्हणजेच रक्कम रूपये 4,87,87,208/- एवढा खर्च होणार आहे. तरी सदर खर्चाचे मंजुरीस्तव व मे.एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 40.00% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : यात शासनाचा निधी किती? 44 टक्के जास्त दराने हे काम गेलेले आहे.

उपअभियंता(स्लम) : शासनाकडून 11.83 कोटी आलेले असून यात राहूलनगर, आंबेडकर नगर तसेच ब्रिजवाडी येथील कामाचा समावेश आहे.

श्री.संजय जोशी : वेगवेगळी कामे आहे किती जास्त दराने आलेली आहे. या कामात 3.48 कोटी काम 44 टक्के जास्त म्हणजे किती होतात.

उपअभियंता (स्लम) : वाटाघाटीमध्ये 40 टक्के जास्त केलेले आहे.

श्री.संजय जोशी : चार टक्के कमी झाले परंतू यात महापालिकेला खर्च होणार आहे का ?

उवअभियंता(स्लम) : बजेटमध्ये प्रोव्हिजन करावी लागेल.

श्री.संजय जोशी : मागिल बैठकीत ही असेच झालेले आहे पाच कोटी शिल्लक 11 कोटीची कचऱ्याचे बाबतीत निवीदा काढली. आता म्हटले की बजेट मध्ये प्रोव्हीजन करावी लागेल.असे असतांना एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रमाअंतर्गत असे नाव का दिले.

उपअभियंता(स्लम) : 3.48 कोटी शासनाकडून मिळतील जो अबाऊ आलेले आहे तो खर्च महापालिकेला करावा लागेल.

श्री.संजय जोशी : या प्रस्तावात उर्वरीत खर्च महापालिकेच्या बजेट मधून खर्च केला जाईल असा उल्लेख यात नाही. नाव शासनाच्या योजनेचे जास्तीचा खर्च महापालिकेचा सर्व गृहीत धरून कार्यवाही होते का? वाढीव रक्कमेला आजच मंजुरी दयावी यापूढे शासनाकडून विविध योजनासाठी जवढे रक्कम येते तेवढयाचीच कामे करावी. महापालिकेचा निधी न टाकता शहरातील इतर विकास कामासाठी तो वापरावा.

श्री.संजय जोशी : वार्डात 50 लक्ष पर्यत कामे अशा योजनेतील कामे वगळून होणार काय याचाही खूलासा घ्यावा.

मा. सभापती : या विषयास मंजूरी देण्यात येते. या कामासाठी खर्चामध्ये जी वाढ होणार आहे त्यासाठी वाढीव तरतुद येणाऱ्या अर्थसंकल्पात करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत मो.ब्रिजवाडी येथे विविध विकास कामे करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक मे.एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.एलोरा कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दरापेक्षा 40.00% जास्त दराने करून घेण्यास तसेच या कामासाठी खर्चामध्ये वाढ होणार असल्याने येणाऱ्या अर्थसंकल्पात वाढीव तरतुद करण्यास देखील सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 391 :**

औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे मानद समन्वयकाचे एक पद दरमहा मानधन रू.5000/- व 11 महिन्याच्या करार पध्दतीने भरण्यासाठी थेट मुलाखतीसाठी जाहीरात देण्यात आली.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने दि.4/12/2007 रोजी एकुण 20 उमेदवारांची तोंडी मुलाखत घेतली. गुणवत्तेनुसार उत्कृष्ट ठरलेल्या श्री.सावरे कोंडीराम शेषराव यांची मानद समन्वयक म्हणुन निवड केलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीस मान्यता देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे मानद समन्वयकाचे एक पद दरमहा मानधन रू.5000/- व 11 महिन्याच्या करार पध्दतीने भरण्यासाठी थेट मुलाखतीमध्ये गुणवत्तेनुसार उत्कृष्ट ठरलेल्या श्री.सावरे कोंडीराम शेषराव यांची मानद समन्वयक म्हणुन नियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 392 :**

औरंगाबाद महानगरपालिका संचलित टाऊन हॉल येथे कलादालनाची दैनंदिन देखभाल व कामे पार पाडण्यासाठी मानद क्युरेटर (काळजीवाहक) एक पद दरमहा मानधन रू.5000/- व 11 महिन्याच्या करार पध्दतीने भरण्यासाठी थेट मुलाखतीसाठी जाहीरात देण्यात आली.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने दि.4/12/2007 रोजी एकुण 11 उमेदवारांची तोंडी मुलाखत घेतली. गुणवत्तेनुसार उत्कृष्ट ठरलेल्या श्री. हंसराज नारायण बन्सवाल यांची मानद क्युरेटर (काळजीवाहक) म्हणुन निवड केलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीस मान्यता देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका संचलित टाऊन हॉल येथे कला दालनाची दैनंदिन देखभाल व कामे पार पाडण्यासाठी मानद क्युरेटर (काळजीवाहक) एक पद दरमहा मानधन रू.5000/- व 11 महिन्याच्या करार पध्दतीने भरण्यासाठी थेट मुलाखतीमध्ये गुणवत्तेनुसार उत्कृष्ट ठरलेल्या श्री. हंसराज नारायण बन्सवाल यांची मानद क्युरेटर (काळजीवाहक) म्हणुन नियुक्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**: ऐनवेळचे विषय :**

**विषय क्र. 393 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.64 विरशैव स्मशानभुमी अद्ययावत करणे करीता सा.बां. विभागाचे सन 2006-07 चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.19,75,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती सोर सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षांतर्गत पान क्र.W 205 अ.क्र.16 अन्वये स्मशानभुमी विकास या लेखाशिर्षांतर्गत करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 19,75,000/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.64 विरशैव स्मशानभुमी अद्ययावत करणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,75,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 394 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिल्लीगेट येथील नेहरू बाल उद्यान विकसीत करणे करीता रक्कम रू.9,99,995/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता श्री. जाधव ए. एम. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार काम प्रगतीपथावर असुन मा.आयुक्त व उद्यान अधिक्षक यांच्या सुचनेनुसार मुलांना पिण्याच्या पाण्याची टाकी, जुन्या घसरगुंडी व खेळणीची दुरूस्ती करणे करीता रक्कम रू.1,99,870/- चे वाढीव अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. उपरोक्त कामांचे एकुण अंदाजपत्रक रक्कम रू.9,99,995 + 1,99,870 = 11,99,865/- व वाढीव काम मुळ गुत्तेदाराकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेट येथील नेहरू बाल उद्यान विकसीत करणे या कामामध्ये मुलांना पिण्याच्या पाण्याची टाकी, जुन्या घसरगुंडी व खेळणीची दुरूस्ती करणे करीता रक्कम रू.1,99,870/- चे वाढीव अंदाजपत्रकास तसेच एकुण अंदाजपत्रक रक्कम रू.9,99,995 + 1,99,870 = 11,99,865/- व वाढीव काम मुळ गुत्तेदार श्री. जाधव ए. एम. यंचेकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 395 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, रविंद्रनगर, टिळकनगर, विश्वभारती कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.9,52,117/- इतकी असुन या कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा विक्री झााल्या होत्या, निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 7.86% जास्त दराने |
| 2. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 12.99% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे असून त्यांच्या निविदेचा दर अं.प.दरापेक्षा 7.86% जास्त असून त्यांची निविदा मान्यतेस्तव तथापि विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रविंद्रनगर, टिळकनगर, विश्वभारती कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा

7.86% जास्त दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 396 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.34 नुर कॉलनी(स्लम) येथे पेव्हर ब्लॉक बसविणेचे कामासाठी सा.बां.विभागाच्या सन 2006-2007 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.11,01,500/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती दि.27/11/2007 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकूण एक निविदा प्राप्त झाली. निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. श्री.काझी मोहंमद फारूख मो. ईस्माईल 10.00% कमी दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदा ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.00% कमी दराची श्री. काझी मो.फारूख मो. ईस्माईल यांची असून सदर निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.34 नुर कॉलनी(स्लम) येथे पेव्हर ब्लॉक बसविणेचे कामासाठी प्राप्त झालेली श्री.काझी मोहंमद फारूख मो.ईस्माईल यांची अं.प.दरापेक्षा 10.00% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 397 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.1 हर्सुल ते जमनज्योती रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,91,000/- असून निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 13.13% जास्त दराने |
| 2. | अरोरा कन्स्ट्रक्शन | 18.12% जास्त दराने |
| 3. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 20.00% जास्त दराने |
| 4. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 21.21% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.13% ने जास्त दर आहेत. सध्या बाजारात डांबराचे भाव वाढल्यामुळे उपरोक्त 13.13% जास्त दराने काम केल्यास या कामावर रक्कम रू.16,69,754/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प. दरापेक्षा 13.13% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.1 हर्सुल ते जमनज्योती रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठभ् प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 13.13% जास्त दराची ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 398 :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(अ) च्या तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रतिवर्षी पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल तयार करणे आवश्यक असुन अहवाल प्रतिवर्षी दि. 31 जुलै पुर्वी प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.

सन 2006-07 या वर्षाचा पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल स्थायी समितीच्या ठराव क्र.179 दि.16/12/2006 अन्वये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांचेकडून रक्कम रू.1,35,000/- या दराने तयार करण्यात आलेला आहे.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांचे पत्र दिनांक 20/2/2008 रोजी प्राप्त झालेले आहे. संस्थेने सन 2007-08 या वर्षाचा पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल रक्कम रू.1,35,000/- + 10% inflation + 12.50% service tax याप्रमाणे एकुण रू.135000+13500+18563= रू.1,67,063/- खर्च अपेक्षीत आहे. सदरच्या दराने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांचेकडुन सन 2007-08 या वर्षाचा पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल तयार करून घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्याची मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67(अ) च्या तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी सन 2007-08 या वर्षाचा पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांचे मार्फत तयार करणेस व त्यासाठी लागणाऱ्या र.रू.1,67,063/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 399 :**

कार्यकारी अभियंता (वि/ड्रे/इ/उ) प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.88 जय विश्वभारती कॉलनी येथील खुल्या जागा विकसीत करण्याच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.19,90,500/- असुन या कामास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यता झालेली आहे. सदरील कााचा खर्च प्रभाग-फ अर्थसंकल्प 2008-09 मधुन करण्याचे प्रस्तावित आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : सदर कामासाठी चालु वर्षाचे अर्थसंकल्प 2007-2008 मध्ये तरतुद उपलब्ध आहे. त्यामधुन सदरचे काम करण्यात यावे. कामाच्या निविदा त्वरीत काढाव्यात.

मा. सभापती : स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी सूचना केल्याप्रमाणे सदरील काम सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पातून करण्यात यावे. कामाच्या निविदा त्वरीत काढण्यात याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रभाग क्र.88 जय विश्वभारती कॉलनी येथील खुल्या जागा विकसीत करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,90,500/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामासाठी त्वरीत निविदा काढाव्यात असेही सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 400 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत एकनाथ रंग मंदीर येथील आसन व्यवस्था बदलणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.27,92,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभेने ठराव क्र.787/7 दि.29.3.2007 अन्वये मान्यता दिलेली आहे. उपरोक्त कामास्तव यापुर्वी तीन वेळेस निविदा मागविण्यात आल्या होत्या. चौथ्या वेळेस निविदा मागविण्यात आल्या असता 1 (एक) निविदा विक्री झाली व 1 (एक) निविदा दर भरून प्राप्त झाली.

1. पेन वर्कर्स 7.60% जास्त दराने

उपरोक्त नुसार पेन वर्कर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.60% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली आहे. त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे. त्यानुसार पेन वर्कर्स यांची अं.प.दरापेक्षा 7.60% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मो.जावेद मो.इसाक : याच बरोबर नेहरूभवन येथील खुर्च्या ख्रराब झालेल्या असून नागरीकांना कार्यक्रम घेण्यास बरोबर वाटत नाही.येणा-या बजेट मध्ये यासाठी तरतूद करण्यात यावी.

मा.सभापती : येणा-या बजेटमध्ये नेहरूभवन साठी तरतुद करण्यात यावी.या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंग मंदीर येथील आसन व्यवस्था बदलणे करीता प्राप्त झालेली पेन वर्कर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.60% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 401 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ई-निविदा कार्यपध्दती कार्यान्वीत करत असतांना निविदेचा स्टेशनरी खर्च कमी होत असल्याने निविदा किंमतीत सुट देण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले होते. सद्यःस्थितीत कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मुलेअ/2003/115 दि.10/8/2003 नुसार निविदा विक्री किंमत ठरविली जात आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.सीएटी 09/05/प्रक्र381/इमारती-2, मंत्रालय, मुंबई 32 दिनांक 15/05/2007 नुसार निविदा संचाची किंमत खालील प्रमाणे आहे..

| अ.क्र. | कंत्राटाची किंमत | निविदा संचाची किंमत |
|---|---|---|

| | | (रूपये) |
|---|---|---|
| 1. | रूपये 15 लक्षा पर्यंत | 500/- |
| 2. | रूपये 15 लक्ष ते 50 लक्ष | 1000/- |
| 3. | रूपये 50 लक्ष ते 200 लक्ष | 5000/- |
| 4. | रूपये 200 लक्ष ते 500 लक्ष | 10,000/- |
| 5. | रूपये 500 लक्ष ते 1000 लक्ष | 15,000/- |
| 6. | रूपये 1000 लक्ष ते 5000 लक्ष | 25,000/- |
| 7. | रूपये 5000 लक्ष पेक्षा जास्त | 50,000/- |

महानगरपालिकेतील बहुतांश कामे रूपये 15 लक्ष पेक्षा कमी किंमतीची असतात, सबब त्याचे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात येऊन, ई-निविदा पध्दतीमुळे महानगरपालिकेचा स्टेशनरी खर्च कमी होत असल्याने त्यांच्या किंमती खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कंत्राटाची किंमत | निविदा संचाची किंमत (रूपये) |
|---|---|---|
| 1. | रूपये 2 लक्षा पर्यंत | 200/- |
| 2. | रूपये 2 लक्ष ते 5 लक्ष | 300/- |
| 3. | रूपये 5 लक्ष ते 10 लक्ष | 350/- |
| 4. | रूपये 10 लक्ष ते 15 लक्ष | 500/- |

तरी 15 लक्ष व त्यावरील कंत्राटी कामांसाठी शासन परिपत्रकानुसार दर अधिक निविदा अभिकर्त्याचे रूपये 160/- निविदा विक्रीसाठी लागु करण्यास तसेच 15 लक्ष खालील कंत्राटी कामांसाठी दर प्रस्तावित केल्याप्रमाणे दर अधिक निविदा अभिकर्त्याचे रूपये 160/- निविदा विक्रीसाठी लागु करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : सबंधीत अधिकारी यांनी या प्रस्तावा विषयी खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पापु.) : निविदेची किमंत जी ठेकेदारला निविदा खरेदी करण्या करीता लागत होती ती शासन निर्णय 2007 प्रमाणे करण्याचा प्रस्ताव आहे. 15 लक्ष पर्यंतचा शासनाच्या निर्णयाप्रमाणे 500 रूपये किंमत आहे. निविदा पुस्तक पूर्वी देत होतो स्टेशनरीसाठी खर्च येत असे. ई-टेंडरींग केल्यापासून तो खर्च आता होत नाही. ठेकेदारास तेवढी सवलत देण्यासाठी हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ई-निविदा कार्यपध्दतीमुळे निविदेचा स्टेशनरी खर्च कमी होत असल्याने निविदा किंमतीत सुट देण्याच्या दृष्टीकोनातून 15 लक्ष खालील कंत्राटी कामांसाठी खालील दर्शविलेल्या वर्गीकरणानुसार दर अधिक निविदा अभिकर्त्याचे रूपये 160/- निविदा विक्रीसाठी लागु करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कंत्राटाची किंमत | निविदा संचाची किंमत (रूपये) |
|---|---|---|
| 1. | रूपये 2 लक्षा पर्यंत | 200/- |
| 2. | रूपये 2 लक्ष ते 5 लक्ष | 300/- |
| 3. | रूपये 5 लक्ष ते 10 लक्ष | 350/- |
| 4. | रूपये 10 लक्ष ते 15 लक्ष | 500/- |

तसेच 15 लक्ष व त्यावरील कंत्राटी कामांसाठी शासन परिपत्रकानुसार दर अधिक निविदा अभिकर्त्याचे रूपये 160/- निविदा विक्रीसाठी लागु करण्यास देखील मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 402 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.38 गांधीनगर अंतर्गत जरीपुरा, चुनाभट्टी, बापुनगर व इतर विविध ठिकाणी रस्त्यावर कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे करीता सा.बां. विभागाची सन 2005-06 च्या जिल्हा दरसुची नुसार एकुण रक्कम रू.11,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 अंतर्गत नविन काँक्रीट रस्ते(स्लम) या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे रक्कम रू.11,00,000/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.38 गांधीनगर अंतर्गत जरीपुरा, चुनाभट्टी, बापुनगर व इतर विविध ठिकाणी रस्त्यावर काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 403 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.38 गांधीनगर येथील मनपा शाळेसमोर, बापुनगर समाज मंदीरासमोर, बंजारा कॉलनी व अंगुरीबाग व इतर विविध ठिकाणी रस्त्यावर काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे करीता सा.बां. विभागाची सन 2005-06 च्या जिल्हा दरसुची नुसार एकुण रक्कम रू.13,98,863/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 अंतर्गत नविन काँक्रीट रस्ते शहर या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे रक्कम रू.13,98,863/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.38 गांधीनगर येथील मनपा शाळेसमोर, बापुनगर समाज मंदीरासमोर, बंजारा कॉलनी व अंगुरीबाग व इतर विविध ठिकाणी रस्त्यावर काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,98,863/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 404 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.64 क्रांतीचौक भागात विविध रस्ते/सर्व्हीस लेन व इत्यादी ठिकाणी रस्त्यावर काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे करीता सा.बां. विभागाची सन 2005-06 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.24,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्याबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 अंतर्गत नविन काँक्रीट रस्ते शहर या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे रक्कम रू.24,00,000/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.64 क्रांतीचौक भागात विविध रस्ते/सर्व्हीस लेन व इत्यादी ठिकाणी रस्त्यावर काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.24,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :मागिल वर्षीच्या बजेट मध्ये वार्ड क्र. 9 नंदनवन कॉलनी मध्ये 13 लक्षचे बजेट मंजूर झाले सदरकामाचे उददघाटत मा. खासदार खैरे साहेब व इतर अधिकारी यांनी केले. जो बॅडमिटन हॉल करणार होतो तो मोठा करावा म्हणून तेथील नागरीकांची मागणी होती व त्यावेळी त्या हॉलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नाव देण्याचे घोषितही केले. आज त्या ठिक्ाणी काही लोक मार्कींग करीत आहे कशाची मार्कींग केली मला माहिती दिली नाही. मार्कींग करून त्या ठिकाणी उददघाटन करणार आहे जो बॅडमिटन हॉल करण्या बाबत महापालिकेने ठरविले तो तेथे होवून त्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाव देण्यात यावे.

मा.सभापती :या संदर्भात उपअभियंता बाधकाम यांनी खुलासा करावा.

उपअभियंता(बांध.) : सदर जागेवर स् सदस्य श्री. ठाकूर पुरूषोत्तम यांनी मागणी केल्यानुसार नंदनवन कॉलनी उद्यानाचा लगत एक भाग आहे क्रिडांगणासाठी एक जाबा राखीव होती तेथे 13 लक्ष खर्च करून हॉल बांधण्याचे प्रस्तावित केले होते. सदस्यांनी त्यासाठी बजेट उपलब्ध करून दिले होते त्याची मान्यता घेवून निविदा काढली त्यात एक ठैकेदार यांनी 15 टक्के बिलोने दर देवून निविदा अंतिम करण्यात आली 2 टक्क् रक्कम भरण्या बाबत कळवले त्यानंतर दोन वेळैस कळवून ही 2 टक्के रक्कम भरणा केली नाही दरम्यानच्या काळात तेथील लोकांची मोठा हॉल व्हावा म्हणून मागणी आहे असे

सदस्यांनी कळविले. त्यासाठी स. सदस्य श्री. ठा ाकूर पुरूषोत्तम यांनी वाढीव आठ लक्षची तरतूद उपलब्ध करून दिली 13 अधिक 8 असे 21 लक्षचे प्रशस्त हॉल बांधावा म्हणून ठराव पारीत झालेला आहे. त्यानुसार प्रस्ताव तयार केला 13 लक्षची निविदा जी होती ती रद्य करावी असे ठरावात नमूद होते ही प्रोसेस चालू असतांना मा. मत्री महोदय यांचे निधीतून पीडब्ल्यूडी मार्फत सभागृह बांधावयाचे आहे म्हणून एनओसी साठी प्रस्ताव महापालिकेकडे आला होता त्या जागेवर मालमत्ता विभागामार्फत एनओसी देण्यात आलेली आहे. व पीडब्ल्यूडी मार्फत काम सुरू होणार असल्याचे माहिती मिळाली.

मालमत्ता अधि. : उपअभियंता बाधकाम विभाग व जिल्हा नियोजन अधिका-या मार्फत विचारणा करण्यात आली होती की या जागेवर आमदार निधीतून बांधकाम करायचे आहे ते करायचे की नाही याची एनओसी देण्याची मागणी केली होती.त्यामूळे त्या जागेच्या संदर्भात सचिका इमारत विभाग नगररचना विभागात पाठवत असतो अहवाल प्राप्त झाल्यानंतर नंतर एनओसी दिली जाते.

मा. सभापती :इमारत बांध. विभागाचा काय अहवाल आलेला होता माहिती दयावी.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :21 लक्ष बॅडमिटन हॉलसाठी मंजूरी झालेली असतांना दुसरा हॉल बाधण्याची एनओसी कशाच्या अधारे दिली गेली.

मालमत्ता अधिकारी :संचिकेमध्ये नेमके काय अभिप्राय आहेत ते बघून माहिती देता येईल.

श्री.मधुकर सावंत :हा एक नगरसेवकाचा अपमान नसून सभागृहाचा अपमान आहे बॅडमिटनहॉल्साठी एक नगरसेवक बजेट ठेवतात सर्व नागरीकांना विश्वासात घेवून सांगितले जाते की या ठिकाणी हॉल होणार आहे हॉल बांधण्याचे नियोजन करतात नागरीकांच्या मागणीनुसार हॉल मोठा व्हावा म्हणून आणखी 8 लक्ष जास्तीची तरतूद करून मंजूरी घेतली जाते 21 लक्षचे नियोजन होते निविदा होते टेंडर होते हे सर्व होत असतांना कूणी एक कार्यकर्ता येतो त्या जागेवर दुसरा हॉल मंजूर करून घेतो हा आपला सर्वांचा अपमान आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :स.सदस्य यांना नागरीक निवडणूक देतात.त्या भागातील नगरसेवकांना कुठल्याच प्रकारची माहिती न देता विश्वासात न घेता संबधीत अधिकारी एनओसी देत असेल त्यांचेवर काय कार्यवाही करणार आजच्या आज कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत त्या वार्डाचे स. सदस्य यानी मा. खासदार, मा. आमदार व वार्डातील नागरीकांना बोलवून त्या ठिकाणी कामाचे उदघाटन केले जाते आणि कुणी बाहेरचा व्यक्ती आमदार फंडातून त्याच जागेवर काम करायचे म्हणून एनओसी घेतो ती दिली जाते हा सभागृहाचा अपमान आहे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :क्रिडांगणासाठी ती जागा असून त्या ठिक्‍राणी बॅडमिटन हॉल तयार करीत आहोत. एनओसी दिल्यामूळे यात सर्व सदस्यांचा तसेच मा.खासदार मा. आमदार तसेच त्या हॉलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचे जाहीर केले होते त्यांचा अपमान आहे. हा विषय गंभ्रीरतेने घेतला नाही व बॅडमिटनहॉल शिवाय दुसरे काम चालूझाल्याससभागृहात आत्मदहन करील.कुणीही येईल मंजूरी घेवून जाईल सभागृहाला माहिती नाही.

मा.सभापती :ज्यांना एनओसी दिली ते कोणते काम त्या ठिकाणी करणार आहे.

उपअभियंता (बांध.) :या संदर्भात मला माहिती नाही.

मा.सभापती :यात अधिका-याची मुळात चूक आहे त्या जागेवर उददघाटन होते बजेट पडते निविदा काढली जाते वाढीव रक्कम पाहिजे होती तीही मंजूर करून दिली आणि दुस-यांना एनओसी दयायची हे बरोबर नाही.

श्री.संजय जोशी :स्पोर्टसाठी आरक्षीत जागा आहे एनओसी कशासाठी दिली.

मा. सभापती :मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

मालमत्ता अधि. :माहिती देण्यासाठी संचिका मागविली आहे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :पत्रकार बंधुना नम्र विनंती की या बातमी मोठी दयावी त्या भागातील जी सोसायटी आहे त्या सोसायटीच्या लोकांचा अपमान केला आहे.सोसायटीने क्रिडांगणासाठी जागा सोडली होती ती अधिकारी यांनी बघीतली नाही. मालमत्ता विभागाने माझा व सभागृहाचा सुध्दा अपमान केला आहे कारण या सभागृहाने त्या कामासाठी निविदेस मंजूरी दिली होती त्याच प्रमाणे त्या जागेचे मा.खासदार तसेच जिल्हा प्रमख श्री. जैस्वाल साहेब यांनी बॅडमिटन हॉलचे उददघाटन केले होते. त्याचा तसेच डॉ.

बाबासाहेब आंबेडकराचे नाव त्या हॉलला देणार आहे याची चौकशी करण्यात यावी. उपअभियंता बांध. यांना सुध्दा एनओसी दिल्याची माहिती नाही.

मा.सभापती :नजर चुकीने झाले असेल तर तसा खुलासा करावा.

उपआयुक्त(म) :नंदनवन कॉलनी येथील खुल्या जागेतील मा. राज्यमंत्री यांचे निधीतून सांस्कृतिक सभागृह बांधण्यासाठी 25 जानेवारी 2008 ला जे ना हरकत प्रमाणपत्र महापालिकेतून दिलेले आहे ते नजरचूकीने दिलेले आहे ते रद्य करण्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी यांना पत्र तात्काळ देण्यात येईल. त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या फंडातून जे पूर्वी बॅडमिटन हॉल मंजूर झालेला आहे ते पुर्ववत चालू करण्यासाठी काही अडचण येणार नाही.

श्री.मधुकर सावंत :राज्य मंत्री देखील हे आपल्या राज्याचे मंत्री आहे त्याचाही मान राखणे आपल्याला गरजेचे आहे त्यांना ही पत्र देवून कळवावे की ही एनओसी नजरचुकीने दिलेली आहे.

मा.सभापती :मा. राज्यमत्री यांनाही एक विनंती पत्र देवून जो त्यांचा निधी आलेला आहे तो इतरत्र दुस-या वार्डात जेथे जागा असेल तेथे वापरण्याची प्रोव्हीजन करण्यात यावी असे पत्रात नमूद करावे. स. सदस्य श्री. ठाकूर पुरूषोत्तम यांचे वार्डातील बॅडमिटनचे हॉल चे जे काम आहे ते त्वरीत चालू करण्यात यावे.

**विषय क्र. 405 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.19, येथील पार्वती कन्या शाळा, एन-9 ते आंबेडकरनगर गृह निर्माण संस्था, एच-सेक्टर पर्यंत 450 मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.24,74,890/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.1211 दि.26.10.2007 अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. इरम कन्स्ट्रक्शन कंपनी | **10.97% कमी दराने** |
| 2. | मे. भवानी कन्स्ट्रक्शन | **9.88% कमी दराने** |
| 3. | उदय इंजिनियरींग वर्क्स | **8.88% कमी दराने** |
| 4. | मे. सय्यद कन्स्ट्रक्शन | **8.01% कमी दराने** |

अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.97% कमी दराची निविदा मे.इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांची आहे. परंतु वॉर्ड क्र.19 चे दुसरे काम पण मे.इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांना मिळाले असल्याने दोन्ही काम एकाच कंत्राटदाराकडून करणे ऐवजी वेगवेगळ्या एजन्सी असल्यास काम जलद गतीने तसेच विहित मुदतीच्या आत होतील म्हणून स.नगरसेवक यांच्या विनंतीनुसार दुसऱ्या क्रमांकाचे स्पर्धात्मक कंत्राटदार मे.भवानी कन्स्ट्रक्शन यांनी पहिल्या क्रमांकाच्या दरात म्हणजेच अं.प.दरापेक्षा 10.97% कमी दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. तसेच मे. इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांची सदर प्रकरणी ना हरकत आहे व त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी मे. भवानी कन्स्ट्रक्शन यांनी स्विकृत केलेली दर अ.प. दरापेक्षा 10.97% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.19, येथील पार्वती कन्या शाळा, एन-9 ते आंबेडकरनगर गृह निर्माण संस्था, एच-सेक्टर पर्यंत 450 मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांना वॉर्ड क्र.19 चे दुसरे काम पण यांना मिळाले असल्याने, विहित मुदतीच्या आत काम व्हावे म्हणून स.नगरसेवक यांच्या विनंतीनुसार दुसऱ्या क्रमांकाचे स्पर्धात्मक कंत्राटदार मे.भवानी कन्स्ट्रक्शन यांनी पहिल्या क्रमांकाच्या दरात म्हणजेच अं.प.दरापेक्षा 10.97% कमी दराने काम करण्यास सहमती दर्शविली असल्याने व मे. इरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांची सदर प्रकरणी ना हरकत असल्यामुळे सदरील काम मे. भवानी कन्स्ट्रक्शन यांनी स्विकृत केलेले दराने म्हणजेच अ.प.दरापेक्षा 10.97% कमी दराने त्यांचेकडून करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 406 :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान लगत येथील सुलभ शौचालयाची मागील दि.13-2-98 पासून सन 2003 पर्यंत व दि.1-4-2003 पासून सन 2008 पर्यंत (पाच-पाच) वर्षासाठी श्रीमती राधाबाई किशोर चावरीया या अधिकृत सुलभ शौचालयाची महानगरपालिकेच्या अटी-शर्ती नुसार देखभाल करीत आहे. त्यांनी शौचालयाची वास्तु व त्यातील शौचालये,

स्नानगृहे इत्यादींची सिती चांगली ठेवली असून स्वच्छताही चांगली आहे. सदर ठिकाणी लागणारे स्वच्छता विषयक साहित्य त्या स्वतःच उपलब्ध करून स्वच्छता करीत असतात.

सुलभ शौचालय जनतेच्या सोयीसाठी नाममात्र शुल्क आकारून उपलब्ध करून दिले जाते. करीता श्रीमती राधाबाई किशोर चावरीया यांचा मागील अनुभव व कामाचे स्वरूप पाहता त्यांना पुढील 11 वर्षासाठी महानगरपालिकेच्या प्रचलित अटी-शर्तीस अधिन राहून मुदतवाढ देण्यास्तव प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान लगत येथील सुलभ शौचालय देखभाल करण्यासाठी श्रीमती राधाबाई किशोर चावरीया यांना त्यांचा मागील अनुभव व कामाचे स्वरूप पाहता त्यांना पुढील 11 वर्षासाठी महानगरपालिकेच्या प्रचलित अटी-शर्तीस अधिन राहून मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 407 :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नक्षत्रवाडी पंपगृह येथील पंपासाठी स्पेअर पार्टस् खरेदीसाठी रक्कम रूपये 15,05,858/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्रमांक 301 दि.17/1/2008 प्रमाणे स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदापत्रकेमागविली असता तीन निविदापत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण दोन निविदापत्रके प्राप्त झाली असून त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1. मे. अमीत इंजिनिअर्स औरंगाबाद | 0.50% कमी दराने |
| 2. मे. ओम मार्केटींग, औरंगाबाद | 6.99% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मे. अमीत इंजिनिअर्स, औरंगाबद यांचे दर तुलनात्मकदृट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मे. अमीत इंजिनिअर्स औरंगाबाद यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी पंपगृह येथील पंपासाठी स्पेअर पार्टस् खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्म्कदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराची मे.अमीत इंजिनिअर्स यांचे निविदा दरानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.50% कमी दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : प्राणी संग्रहालयातील एक वाघाचा मृत्यू झालेला आहे याची माहिती सभापती म्हणून आपल्याकडे आलेली आहे काय?

मा.सभापती : या बाबत माझेकडे माहिती आलेली नाही. संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

श्री.अ.रशिद खान : संबधीत अधिकारी उपस्थित नाही मा. सभापती यांना त्यानी ही माहिती देणे आवश्यक होते. हरिण मेले तर डॉ.रझवींवर कार्यवाही, आता वाघ मेल्यावर काय कार्यवाही करणार.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी या संबधीत माहिती घेवून माझेकडे कळवावी.

श्री.वसंत नरवडे : गेल्या वर्षीच्या बजेटच्या संदर्भात जमा व खर्च आढावा बैठक घेतली होती. त्यावेळी प्रत्येक वार्डातील 50 लक्षची कामे कमी केली. 103 वार्डात आज रोजी 50 कोटीची वरती कामे आहे चालू वर्षाचे बजेट उशीर आले म्हणून मे जून मध्ये हाताळले 100 कोटीची कामे ही स्पील ओव्हरमध्ये जात आहे.पूढील वर्षाचे बजेट अदयाप आलेले नाही मार्च अखेर पर्यत बजेटला मान्यता दिली जावी.या दृष्टी कार्यवाही सुरू आहे की नाही.

मा.सभापती : बजेट तयार करण्याचे कामकाज चालू आहे. लेखा विभागाचे संबधीत जे असतील त्यांनी खुलासा करावा.

लेखाधिकारी (श्री.दुर्रानी) : सन 2007-08 व 2008-09 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मार्च पहिल्या आठवडयात स्थायी समिती समोर ठेवण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे : आर्थीक तरतुदीसाठी मागिल वर्षीचा जमा खर्च झाला त्या संबधी बैठक आयोजित करून चर्चेला घेण्यात यावे. कोणत्या तारखेला येईल निश्चित द्यावे 31 मार्चपर्यत

सर्वसाधारण सभेपूढे आले पाहिजे. बजेट तयार करण्यास कोणती यंत्रना कमी पडते का? मा.आयुक्त, लेखधिकारी सभेत उपस्थित नाही. मागिल वर्षातील उशीरा बजेट आल्यामूळे चार महिणे हाताळता आले नाही नंतरच्या आठ महिण्यात 150 कोटी स्पील ओव्हरमध्ये येत आहे. त्यासाठी या वर्षाची परीस्थिती काय आहे या बाबतीत लेखा विभागाने तत्परतेने काम केले पाहिजे.बजेट सादर होण्यास उशीर होवू नये वसूली का झालेली नाही त्यामूळे नागरीकाची विकास कामे होत नाही. कराच्या बाबतीत अनेक वाद निर्माण झालेले आहे. 31 मार्चच्या अगोदर सर्वसाधारण सभेकडे बजेट यावे यादृष्टीने कार्यवाहीचे आदेश करावे.

मा.सभापती : बजेट लवकर सादर होईल या दृष्टने प्रशासनाने काम करावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मालमत्ता कर आकारणी विभागात ठराविक कर्मचा-यांनाच का घेण्यात आले चार हमाल श्री.देविदास विश्वासू, श्री. अधाने, देविदास म्हस्के, कचरू धोडीराम यांना घेतले वसुलीसाठी मजुरांची गरज नसते ज्यांचेवर पुर्वी भ्रष्टाचाराचे आरोप होते त्यांनाच घेतले गेले. याची मान्यता कुणी दिली माझे माहिती प्रमाणे अस्थापना विभागाचा कन्स्ल्ट घेतले नाही. श्री.वामन कांबळे नावाचे कर्मचारी या विभागात जाण्यासाठी सहा महिण्यापासून मागे होते.

कर निर्धारक व संकलक : 31 डिसेंबर 2007 पासून स्पेकचे काम बंद केले आहे. सिडको भागामध्ये काही मिसींग मालमत्तास कर लावणे आवश्यक होते. त्यामूळे 25 जानेवारी 08 रोजी या कामासाठी 9 कर्मचा-यांचे आदेश काढले त्यापैकी चारच हजर झाले पून्हा 18-2-2008 रोजी पाच कर्मचा-यांची आदेश काढले त्यापैकीही तीनच हजर झाले

मा.सभापती : दोन वेळेस आदेश काढूनही कर्मचारी रूजू का झालेले नाही.काढलेले आदेश बंधनकारक आहे की नाही.

कर नि. व संकलक : संबधीत खाते प्रमुखांनी त्या कर्मचा-यांना कार्यमुक्त केले नाही. त्यामुळे सुधारीत आदेश काढावे लागले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ज्यांनी कार्यमुक्त केले नाही त्यांना विचारणा करून आदेश काढले होते काय.

कर नि.व संकलक : 25 जानेवारीचे आदेश काढण्यापूर्वी खातेप्रमुखांना विचारणा केलेली नव्हती परंतू 18 फेब्रुवारी 2008 रोजी काढलेले आदेश हे डायरेक्ट कार्यमुक्त करण्या बाबद काढलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री. मगर, श्री.कांबळे नावाचे कर्मचारी वादग्रस्त आहे. सहा महिण्यापासून या विभागात येण्यासाठी प्रयत्न करीत होते अशा लोकांनाच का घेण्यात आले. पूवीच्या आदेशानुसार जे रूजू झाले नाही त्यांचे बाबतीत रिपोर्ट केला होता का? ठराविक लोकांना का घेण्यात आले काही ठराविक कर्मचारी यांनी सर्वसाधारण सभेपूढे मा.महापौर व काही सदस्यांना मिळून ठराव आणला होता तो रद्द केला तेच कर्मचारी या विभागात आलेले आहे.

कर नि. व संकलक : ठराविक कर्मचारीच घेतले असे नाही. 31 मार्च पर्यत हे आदेश आहेत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आदेश कितीही दिवसाचे असतील त्याबध्दल वाद नाही. परंतू जे काही बदलीचे आदेश काढले जाते ते अस्थापना विभागाकडून कार्यवाही होते. असे असतांना या कर्मचा-यांच्या बदल्या डायरेक्ट टॅक्स सेक्शनच्या मार्फत कोणत्या रूल प्रमाणे केल्या. यापूर्वी अशा प्रमारे बदल्या केल्या आहेत का ?

करमुल्य नि.व संकलक:मा. आयुक्तांच्या मान्यतेने बदल्या केल्या पुर्वी ज्यांनी या विभागात काम केले त्यांचे नावाचे प्रस्ताव माझ्या मार्फत सादर केला होता.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पुर्वी त्या विभागात जे लोक काम करीत होते त्यांचेच नाव का प्रपोज केले गेले.जे रूजू झाले त्यांचेमूळे लोकांना त्रास होत आहे. परंस्पर हे कर्मचारी कमी जास्त टॅक्स करीत आहे वाटाघाटी करून कार्यवाही करीत आहे.पेपरमध्ये मोठमोठे जाहीर छापून येत आहे.नवीन कर लावण्यासाठी शिपाई न घेता चार लेबरची का गरज पडली.

करमुल्य नि.व संकलक: या विभागात सध्या सहा कर्मचारी काम करतात अस्थापना -2 कडे 16 शिपायाची मागणी केली होती त्यापैकी 6 कर्मचारी आदेश प्राप्त झाले. लेबर हे टॅक्स लावण्यासाठी नसून नोटीस वाटपासाठी घेतले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :किमान लेबर ऐवजी शिपाई घ्यायला पाहिजे लेबर कर्मचारी यांना वाचता लिहिता येत नाही. ते नोटीस कसे वाटप करणार.

श्री.मधुकर सांवत :प्रभाग कार्यालयात अनेक लेबर हे वसूलीसाठी दिलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :जे कर्मचारी नागरीकांना यापूर्वी त्रास देत होत त्यांचीच नावे प्रपोज करून पून्हा या विभागात घेण्याचे कारण काय कोणत्या नियमानुसार नावे प्रपोज केली होती.

कर निर्धा. व संकलक : यापूर्वी या विभागात कोणत्या कर्मचारी यांनी काम केलेले आहे याची माहिती श्री. कालेले मालमत्ता अधिकारी यांचेकडे मागविली होती 9 कर्मचारीच मिळाले त्यांचे नाव प्रप्रोज केले होते. मंजुरी मिळाल्यानुसार त्यांचे आदेश काढले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : यातील एक कर्मचारी यांनी 2001 चे पीआर कार्ड दाखवून 2006 चा टॅक्स आकारणी केली. त्या कर्मचा-याची चौकशी चालू आहे निलंबनाची संचिका आयुक्ताकडे आहे त्यांचे नाव बरोबर कसे गेले. तसेच वामन कांबळै ही वादग्रस्त कर्मचारी आहे या विभागात 1982 पासून 800 कर्मचारी यांनी कामे केले असतांना ठराविक लोकांचे नाव प्रपोज करून त्यांना का घेण्यात आले.

मा.सभापती : ज्या ज्या कर्मचारी यांची तक्रार असेल वादग्रस्त असेल याची चौकशी करून त्यांना त्या विभागात ठेवू नये. नागरीकांना त्रास होत असेल तर ते कर्मचारी त्या विभागात न राहिलेले बरे.

कर निर्धा.व संकलक :ज्या कर्मचाऱ्यांविषयी तक्रार व हरकत असेल त्यांची तात्काळ बदली करण्याची कार्यवाही होईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :1997 साली एका प्रकरणात भ्रष्टाचार झालेला होता त्या प्रकरणाची चौकशी तत्कालीन विभागीय आयुक्त श्री. भोगे साहेब यांनी केली व श्री.डी.पी. कुलकर्णी यांचे सोबत जे दोषी अधिकारी कर्मचारी आहे यांचेकडून रू.1,47,023 इतकी रक्कम वसुल करण्याचे आदेशीत केले होते. ते वसुल केले नाही. त्यावेळी शासनाचे प्रधान सचिव मा. रामानंद तिवारी यांनी ही रक्कम वसूल करण्यासाठी दिं. 29 सप्टेंबर 1999 ला महापालिकेला आदेशीत केले होते. माहिती विचारली असता श्री.डी.पी. कुलकर्णी यांना समज दिली व श्री. गायकवाड यांची एक वेतनवाढ बंद केली होती. शासन स्तरावर प्रलंबीत आहे. विभागीय आयुक्त व शासनाचे एक सचिव यांनी आदेश दिल्यानंतर ही अधिका-यांना फक्त समज देवून रक्कम वसूल न करणे हे अधिकार महापालिकेला कोणत्या ॲक्टनुसार आहे. या प्रकरणाच्या संदर्भात मी मा.उच्च न्यायालयात प्रकरण दाखल करणार आहे खुलासा द्यावा.

उपआयुक्त (म.) : सदर प्रकरणात 1999 मध्ये निर्णय झालेला आहे. तो निर्णय कशा पध्दतीने झालेला आहे ते बघून माहिती दिली जाईल.

मा.सभापती : पूढील बैठकीत याची माहिती घेवून देण्यात यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : माझ्या वार्डात फुलेनगर भागात 25-30 वर्षापासून बुध्दविहार उभा आहे. तेथे धर्माचे ज्ञान दिले जाते. परंतू एका व्यक्तीच्या नावाने त्या बुध्दविहारास टॅक्स लागलेला आहे तो त्वरीत रद्द करावा.

मालमत्ता अधिकारी :शहरातील टॅक्स हे वार्ड अधिकारी लावतात.

उपआयुक्त सिडको : या संदर्भात संबधीत वार्ड अधिकारी यांचेकडून माहिती घेवून टॅक्स लागलेला आहे किंवा नाही उद्याच कळविले जाईल.

मा.सभापती : या संदर्भात माहिती घेवून नियमानुसार कार्यवाही करावी.

राष्ट्रगिता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद